( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**[२०२३] ३ S.C. R. ६६६**

**अनिल कुमार**

**विरुद्ध**

**हरियाणा राज्य आणि इतर.**

**(रिट याचीका (फौ.) क्रमांक ४६/२०२२)**

**२४ मार्च २०२३**

**न्यायमूर्ती एम. आर. शाह आणि न्यायमूर्ती सी. टी. रवीकुमार**

हरियाणा सदाचारी बंदी (तात्पुरती सुटका) कायदा, १९८८ कलम ३(३)- कोविड-१९ महामारीमुळे सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या आदेशानुसार स्थापित उच्चाधिकार समितीच्या निर्णयानुसार याचिकाकर्त्याला आपत्कालीन /तात्पुरत्या अभिवचन रजेवर सोडण्यात आले होते- अशा अभिवचन रजेचा कालावधी जर याचिकाकर्त्याच्या एकूण शिक्षेच्या कालावधीत गणला जाईल का?- निर्णय घेण्यात आला- हरियाणा राज्यामध्ये तात्पुरत्या अभिवचन रजेचा कालावधी हा अधिनियम १९८८ च्या वैधानिक तरतुदींनुसार अधिशासित केली जातो- १९८८ च्या कायद्यातील समाविष्ट कलम ३ (३), ज्यामध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की तात्पुरत्या सुटकेचा कालावधी कैद्यांच्या शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही.- जेव्हा याचिकाकर्त्याला भारतीय दंड विधानामधील कलम ३०२/३४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले जाते आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली जाते, तेव्हा त्याला माफीच्या संदर्भात कोणत्याही नियम/धोरणाच्या अधीन राहूनच ही शिक्षा भोगावी लागते आणि ज्या कालावधीत त्याला आपत्कालीन/अंतरिम अभिवचन

रजेवर सोडण्यात आले आहे तो कालावधी प्रत्यक्ष कारावासाच्या उद्देशासाठी वगळण्यात यावा.- याचिकाकर्त्याला प्रस्तूत रिट याचिकेत विनंती केलेल्या कोणत्याही दिलाशासाठीचा दावा करण्याचा अधिकार नाही.-दंड संहिता, १८६०- कलम ३०२/३४- भारतीय राज्य घटना - अनुच्छेद ३२

रोहन धुंगट आणि इतर विरुद्ध गोवा राज्य आणि इतर **(विशेष अनुमती याचिका (फौ.) क्र. १२५७४-७७/२०२२): (2023 SSC Online SC 16);** हरियाणा राज्य आणि इतर विरुद्ध मोहिंदर सिंग **(२०००) ३ SCC ३९४: [२०००] १ S. C. R. ६९८**- भर देण्यात आला

अवतार सिंग विरुद्ध हरियाणा राज्य **(२००२)३ S.C.C१८: [२००२] १ S. C. R. १०८२- संदर्भित**

## <u>निर्णय विधी संदर्भ</u>

**[२००२] १ S. C. R . १०८२ संदर्भ देण्यात आला परिच्छेद ३.३**

**[२००२] १ S. C. R . ६९८ भर देण्यात आला परिच्छेद ३.३**

**अनिल कुमार विरुद्ध हरियाणा राज्य आणि इतर**

**फौजदारी मूळ न्यायाधिकार क्षेत्र**

**रिट याचिका (फौ.) क्रमांक ४६/२०२२**

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत-

तुषार मेहता, एसजी, कु ऐश्वर्या भाटी, बलबीर सिंग, ए.एस.जी., श्रीमती गरिमा प्रसाद, सीनियर ए.ए.जी., कु बांसुरी स्वराज, ए.ए.जी., सौ. अंकिता चौधरी, डी.ए.जी., एस. सी. वर्मा, वरिष्ठ अॅड., कु रितू कुमार, सत्य मित्रा, श्रीकांत नीलप्पा तेरदल, डॉ. एन. विशाकमूर्ती, अंकुर तलवार, कु. स्वाती घिलडियाल, रजत नायर, कु. आना उपाध्याय, सुश्री मन्या हसिजा, आकाश सिंग, निहार धर्माधिकारी, कु. सम्प्रीती बक्सी, डॉ. मोनिका गुसैन, मनीष कुमार, विजय कुमार, राहुल देव सिंग, विनोद शर्मा, मे. पारेख अँड कंपनी, तल्हा अब्दुल रहमान, मलक मनीष भट्ट, कु. उत्तरा बब्बर, कु. स्नेहा कलिता, गौरव अग्रवाल, विवेक नारायण शर्मा, कु. महिमा भारद्वाज, कु. लक्षा भवनानी, शुभम अवस्थी, प्रांशु कौशा, राजीव कुमार झा, राम कुमार, टी.एल.व्ही. रामाचारी, हितेश कुमार शर्मा, अखिलेश्वर झा, कु. निहारिका द्विवेदी, अमितकुमार चावला, टी.एन. रामाराव, अशोक रेड्डी, जी. एन. रेड्डी, कु जयश्री सातपुते, प्रसन्न एस., निर्मल कुमार अंबस्थ, कु.अश्मिता बिसार्या, डॉ. जोसेफ अरिस्टॉटल एस., शोभित द्विवेदी, कु.नुपुर शर्मा, मनेंद्र पाल गुप्ता, वरुण वर्मा, धनेश ईशधन, व्ही. एन. रघुपती, पुक्रंबम रमेश कुमार, करुण शर्मा, कु. अनुपमा नगंगोम, कु. तरुणा अर्धेन्दुमौली प्रसाद, श्रीरंग बी. वर्मा, सिद्धार्थ धर्माधिकारी, आदित्य ए. पांडे, भरत बागला, सौरव सिंग, एम. योगेश कन्ना, अविजित मणी त्रिपाठी, उपेंद्र मिश्रा, पी.एस. नेगी, कृष्णानंद पांडे, निर्निमेष दुबे, सिद्धेश कोतवाल, निहार धर्माधिकारी, कु.संप्रीती बक्षी, नीरज शेखर, डॉ.सुमित कुमार, आशुतोष ठाकूर, केशव बाहेती, चंद्र प्रताप, राज बहादूर यादव, हरमीत सिंग रुपराह, अनुपम रैना, इर्शाद अहमद, जी. एम. कावूसा, कु पलक मित्तल, शैलेश मडियाल, कु. सिमरन सद्योरा, मोहम्मद. फरहान खान, विनोद शर्मा, कु. आस्था शर्मा, श्रीसत्या मोहंती, संजीव कौशिक, कु. मतिका हरयानी, श्रेयस अवस्थी, हिमांशू चक्रवर्ती, कु. रिपुल स्वाती कुमारी, भानू मिश्रा, कु. मुस्कान सुराणा, कु. सुप्रिया जुनेजा, शिबाशिष मिश्रा, के. राजीव,

मैबाम नबाघनश्याम सिंग, श्रीधर वाई चितळे, प्रणय चितळे, सुश्री मुक्ती चौधरी, कन्हैया सिंघल, जसमीत एस. चढ्ढा, प्रसन्ना, पी.एस. सुधीर, ऋषी माहेश्वरी, ऍनी मॅथ्यू, भरत सूद, कु श्रुती जोस, संदीप सिंग, सुभाष चंद्रन, सयुज मोहनदास एम. कु. कविता केटी, राकेश कुमार सिंग, अशोक आनंद, समंथा पधान, राजीव रंजन, मे. व्यंकट पालवाई लॉ असोसिएट्स, कु. के. इनाटोली सीमा, सुश्री लिमयिन्ला जमीर, अमित कुमार सिंग, कु. चुबलेमला चांग, प्रांग न्यूमाई, कु. राधिका गौतम, श्रीमती तरुणा सिंग गोहिल, महफूज अहसान नाझकी, पोलंकी गौथम, शेख मोहम्मद हनीफ, टी विजया भास्कर रेड्डी, सुश्री राजेश्वरी मुखर्जी, सुश्री निती रिचारिया, के.व्ही. गिरीश चौधरी, मिलिंद कुमार, तपेश कुमार सिंग, महेश ठाकूर, मैबम नबाघनश्याम सिंग, ऋषी मल्होत्रा, मे. लांबट आणि लेगीटम, किशोर लांबट, कु. काश्मिरा लांबट, सचिन पाहवा, सुजा जोशी, सुमीर सोधी, देवाशिष तिवारी, संतोष कुमार, मे. अर्पुथम अरुणा आणि कंपनी, अवनीश अर्पुथम, कु. अनुराधा अर्पुथम, अंकित शर्मा, गौरव खन्ना, गुरमीत सिंग मक्कर, विनय अरोरा, संजयकुमार पाठक, अरविंदकुमार त्रिपाठी, सौ.शशी

पाठक, अमरीश कुमार, निशे राजेन शोनकर, श्रीमती अनु के जॉय, अलीम अन्वर, एम. शोएब आलम, जी. प्रकाश, कु. बिनू टमटा, मनीष कुमार, प्रशांत श्रीकांत केंजळे, निखिल गोयल, कु. नवीन गोयल, आदित्य कोशी रॉय, सिबो शंकर मिश्रा, सुनील मुंड, निरंजन साहू, देबब्रत दाश, कु. अपूर्व शर्मा, अरविंद एस., कु. उमा भुवनेश्वरी. सी, अब्बास. बी., समीर अभ्यंकर, कु. निशी संगतानी, कु. वाणी वंदना छेत्री, सचिन पाटील, नरेंद्र कुमार, राघवेंद्र कुमार, आनंदकुमार दुबे, सुश्री राजलक्ष्मी सिंग, सुनील सरोगी, अपूर्व कुरूप, कु. निधी मित्तल, विष्णू शंकर जैन, कु.रंजीता रोहतगी, शुभदीप रॉय, साई शशांक, दीपयन दत्ता, एस. थनंजयन, कु. मृणाल गोपाल एलकर, सुशील तोमर, श्रीहर्ष पेचारा, धुव्वुरी सुब्रह्मण्य भानू, राजीव कुमार चौधरी, अनूप प्रकाश अवस्थी, विवेक कुमार तिवारी, सुश्री दिव्या द्विवेदी, अभिमन्यू तिवारी, कु. एलिझा बार,- पक्षकारांसाठी उपस्थित असलेले वकिल

न्यायालयाने पुढाकार घेऊन

अर्जदार व्यक्तिशः उपस्थित असल्याने

न्यायमूर्ती एम. आर. शाह यांनी न्यायनिर्णय दिला :

१. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अन्वये दाखल केलेल्या या रिट याचिकेद्वारे, हरियाणा राज्यातील याचिकाकर्ता-सिद्धदोषी ने या न्यायालयाच्या स्वाधिकारे रिट याचिका क्र. १/२०२० मध्ये पारित दिनांक २३/०३/२०२० च्या आदेशानुसार स्थापित उच्चाधिकार समितीचा दिनांक ०९/०५/२०२१ चा निर्णय रद्द करून बाजूला सारण्याचा आदेश किंवा निर्देश देण्याची विनंती केली आहे , त्यात असे नमूद केले आहे की, अंतरिम अभिवचन रजेवर सुटण्याचा कालावधी दोषी कैद्याच्या शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही.

२. याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकील कु. रितू कुमार यांनी जोरदारपणे असे निवेदन केले की, याचिकाकर्त्याला या न्यायालयाने SWM (C) क्रमांक १/२०२० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार स्थापित उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निर्णयानुसार आपत्कालीन अभिवचन रजेवर सोडण्यात आले होते. या न्यायालयाने त्यानंतरच्या आदेशात असे निर्देश दिले आहेत की, उच्चाधिकार समितीच्या निर्णयानुसार

ज्या दोषींना यापूर्वी तातडीच्या अभिवचन रजेवर सोडण्यात आले होते, त्यांना पुढील आदेशापर्यंत शरण येण्यास सांगितले जाणार नाही. असे सादर करण्यात आले आहे की, याचिकाकर्त्याची सुटका ही याचिकाकर्त्याने केलेल्या कोणत्याही अर्जाद्वारे आणि/किंवा हरियाणा सदाचारी बंदी (तात्पुरती सुटका) कायदा, १९८८ (यापुढे कायदा, १९८८ म्हणून संदर्भित) च्या कलम ३(३) अंतर्गत झालेली नसुन त्यास उच्चाधिकार समितीच्या निर्णयानुसार सोडण्यात आले आहे. असे सादर करण्यात आले आहे की, त्यानंतर ०९/०५/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत, उच्चाधिकार समितीने अंतरिम/विशेष अभिवचन रजेवरील सुटकेचा कालावधी हा कैदी/दोषी यांच्या शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही असा निर्णय घेऊ शकले नाहीत.

२.१ असे निवेदन केले गेले की, जिथपर्यंत इतर राज्यांचा संबंध आहे, अंतरिम अभिवचन रजेवरील सुटकेचा कालावधी दोषी/कैद्याच्या एकूण शिक्षेच्या कालावधीमध्ये मोजला जाण्याचे निर्देश आहेत.

२.२ याचिकाकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी पुढे असे सादर केले आहे की, जर याचिकाकर्त्याची अंतरिम अभिवचन रजेवर सुटका झाली नसती आणि त्याने शिक्षा भोगलेली असती, तर अशा परिस्थितीत शिक्षेच्या ठराविक कालावधीनंतर तो माफीसाठी पात्र ठरला असता. पुढे असे निवेदन करण्यात आले आहे की, याचिकाकर्त्याला अंतरिम अभिवचन रजेवर सोडण्यात आले होते आणि जर हा कालावधी शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये मोजला गेला नाही तर अशा परिस्थितीत माफीचा दावा करण्याचा त्याचा कालावधी वाढवला जाईल जो याचिकाकर्त्यासाठी अहितकारक ठरू शकतो.

२.३ वरील निवेदने सादर करून, ज्या रिटसाठी विनंती केली आहे ती जारी करण्याची प्रार्थना केली जात आहे.

३. राज्याच्या वतीने हजर असलेल्या विद्वान ए. ए. जी. (A.A.G. ) बांसुरी स्वराज यांनी प्रस्तूत रिट याचिकेला तीव्र विरोध केला आहे.

३.१. राज्याच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकिलांनी जोरदारपणे सादर केले आहे की प्रस्तूत प्रकरणात याचिकाकर्ते-दोषी यांना भारतीय दंड विधान च्या कलम ३०२/३४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी दोषी ठरवण्यात आले आहे आणि त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.हे सादर केले आहे की, विद्वान संपरीक्षा न्यायालयाने दिलेला शिक्षादेश आणि दोषसिद्धी या न्यायालयापर्यंत  कायम ठेवण्यात आली आहे आणि विशेष अनुमती याचिका फेटाळण्यात आली आहे. असे सादर  करण्यात आले आहे की, त्यामुळे याचिकाकर्त्याला कायद्यानुसार आणि संपरीक्षा न्यायालयाने दिलेल्या शिक्षेनुसार जन्मठेपेची शिक्षा भोगावी लागेल.

३.२ त्यानंतर, कोविड-१९ महामारीमुळे या न्यायालयाने SWM (C) क्र. १/२०२० मध्ये जारी केलेल्या निर्देशांनुसार स्थापित उच्चाधिकार समितीच्या आदेशानुसार याचिकाकर्त्याला आपत्कालीन /तात्पुरत्या अभिवचन रजेवर सोडण्यात आले आहे.असे सादर करण्यात आले आहे की, तात्पुरता/आपत्कालीन अभिवचन रजा मंजूर करताना सुरुवातीला उच्चाधिकार समितीने १२/११/२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात परिच्छेद ४ मध्ये विशेषत: असे निदर्शनास आणले आहे की, शिक्षेमध्ये विशेष अभिवचन रजेचा कालावधीची गणना न करण्यासाठी कोणतेही विशिष्ट निर्देश वैधानिक तरतुदी लक्षात घेऊन करणे आवश्यक नाही आणि अधिकाऱ्यांना वैधानिक तरतुदींनुसार उक्त बाबींवर

निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. असे सादर केले आहे की १९८८ च्या कायद्याच्या कलम ३(३) नुसार, तात्पुरती सुटका/अभिवचन रजेचा कालावधी कैद्यांच्या शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही. असे सादर केले आहे  की त्यानंतर जेव्हा या न्यायालयाने जारी केलेल्या पुढील निर्देशांनुसार आपत्कालीन /तात्पुरती अभिवचन रजा आणखी वाढविण्यात आली, तेंव्हा उच्चाधिकार समितीने बैठकीच्या इतिवृत्तात नमूद केल्यानुसार विशेषत: अंतरिम अभिवचन रजेवर सुटका करण्याचा कालावधी दोषी - कैद्याच्या एकूण शिक्षेच्या कालावधीत गणला जाणार नाही, जे वैधानिक तरतुदींशी सुसंगत आहे.त्यामुळे, उच्चाधिकार समितीने ०९/०५/२०२१ रोजी घेतलेल्या बैठकीत अंतरिम अभिवचन रजेवर सुटका करण्यात आलेल्या कालावधीबाबत घेतलेला निर्णय कैदी/दोषी यांच्या शिक्षेच्या एकूण कालावधीत गणला जाणार नाही, असा निर्णय बेकायदेशीरही नाही आणि किंवा वैधानिक तरतुदींच्या विरोधातही नाही.

३.३ पुढे असे सादर करण्यात आले आहे की अभिवचन रजेचा कालावधी हा दोषी-कैद्यांच्या शिक्षेच्या एकूण कालावधीसाठी मोजला जाणार आहे की नाही हा मुद्दा **रोहन धुंगट आणि इतर विरुद्ध गोवा राज्य आणि इतर (विशेष अनुमती याचिका (फौ.) क्र. १२५७४-७७/२०२२): (2023 SSC Online SC 16)** या प्रकरणातील या न्यायालयाच्या अलीकडे  दिलेल्या  न्याय निर्णयाचा विचार करता नवीन मुद्दा नाही ज्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. असे सादर करण्यात आले आहे की, या मुद्द्यावर कायद्याचा विचार केल्यानंतर आणि पूर्वीचे न्याय निर्णय विचारात घेतल्यानंतर, या न्यायालयाने विशेषतः असे निरीक्षण नोंदवले आहे आणि असे म्हटले आहे की, ज्या कालावधीत एखाद्या दोषीला अभिवचन रजेवर सोडण्यात आले आहे तो कालावधी प्रत्यक्ष कारावासाचा विचार करताना मोजला जाणार नाही.

असे सादर करण्यात आले आहे की, **अवतार सिंग विरुद्ध हरियाणा राज्य (२००२) ३ SCC १८** या प्रकरणात या न्यायालयाने '१९८८ कायद्याच्या ' कलम ३(३) च्या घटनात्मक वैधतेचा विचार केला आणि घटनात्मक वैधता धारण करताना, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, वैध विधिमंडळ कायद्यानुसार, दोषी - कैद्याने भोगलेल्या वास्तविक शिक्षेची मोजणी करताना अभिवचन राजेवरील तात्पुरती सुटका करण्यात आलेला कालावधी नाकारला जाऊ शकतो. असे सादर करण्यात आले आहे की, त्यानंतर **हरियाणा राज्य आणि इतर विरुद्ध मोहिंदर सिंग (२०००) ३ SCC ३९४**, या प्रकरणात या न्यायालयाने विशेष निरीक्षण नोंदविले आहे आणि असे मानले आहे की अभिवचन रजेचा कालावधी शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये मोजला जाऊ नये कारण जेव्हा एखादा कैदी अभिवचन रजेवर असतो तेव्हा त्याच्या सुटकेचा कालावधी शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये मोजला जात नाही.

३.४ वरील निवेदने सादर करून, प्रस्तूत रिट याचिका फेटाळण्याची विनंती करण्यात आली आहे .

४. या न्यायालयाच्या विचारार्थ प्रस्तूत प्रश्न हा आहे की, या न्यायालयाने एस.डब्ल्यू.एम. (SWM) (फौ.) क्रमांक १/२०२० या प्रकरणात दिलेल्या आदेशानुसार गठित उच्चाधिकार समितीच्या निर्णयानुसार तात्पुरत्या /आणीबाणीच्या अभिवचन रजेवर सुटका करण्यात आलेल्या दोषी/कैदी यांच्या अभिवचन रजेचा कालावधी दोषी - कैद्याच्या एकूण शिक्षेच्या कालावधीत गणला जाईल का?

४.१ प्रारंभीच, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, हरियाणा राज्याचा विचार करता, अभिवचन राजेवरील करण्यात आलेली तात्पुरती सुटका ही हरियाणा सदाचारी बंदी

(तात्पुरती सुटका) अधिनियम, १९८८ च्या वैधानिक तरतुदींनुसार अधिशासित केली जाते. १९८८ च्या कायद्यातील समाविष्ट  कलम ३ (३), ज्यामध्ये विशेषतः अशी तरतूद आहे की तात्पुरत्या सुटकेचा कालावधी कैद्यांच्या शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही. त्यानंतर, या न्यायालयाने जारी केलेल्या निर्देशांनुसार स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीने १२/११/२०२० रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तात दोषी/कैद्यांना तात्पुरत्या /आपत्कालीन अभिवचन रजेवर सोडण्याचे निर्देश दिले आणि असे निरीक्षण नोंदवले की शिक्षेमध्ये विशेष अभिवचन रजेचा कालावधीची गणना न करण्यासाठी कोणतेही विशिष्ट निर्देश वैधानिक तरतुदी लक्षात घेऊन करणे आवश्यक नाही आणि अधिकाऱ्यांना वैधानिक तरतुदींनुसार उक्त बाबींवर निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर, जेव्हा या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांनुसार आपत्कालीन/तात्पुरत्या अभिवचन रजेला आणखी मुदतवाढ देण्यात आली आहे, तेव्हा बैठकीच्या कार्यवृत्तांत/नोंदीत विशेषतः अशी तरतूद आहे की, उच्च-शक्ती समितीच्या निर्णयानुसार सुटकेचा कालावधी कैदी/दोषीच्या शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही. त्यामुळे सदर नोंदी ह्या १९८८ च्या कायद्यातील  कलम ३ (३) या वैधानिक तरतुदीशी पूर्णपणे सुसंगत आहे.

५. या टप्प्यावर, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की कायदा, १९८८ कायद्यातील अंतर्भूत  कलम ३ (३) च्या अधिकारक्षेत्रास  या न्यायालयासमोर आव्हान देण्यात आले होते आणि अवतार सिंग (उपरोक्त) या प्रकरणामध्ये दिलेल्या निकाल आणि आदेशाद्वारे, या न्यायालयाने १९८८ कायद्यातील अंतर्भूत  कलम ३ (३) चे अधिकारक्षेत्र कायम ठेवले आहे.

५.१ त्यानंतर, **मोहिंदर सिंग (उपरोक्त)** प्रकरणात, या न्यायालयाने विशेष निरीक्षण नोंदवले आहे आणि असा निर्णय दिला आहे की अभिवचन रजेचा कालावधी

शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जाणार नाही. असे निरीक्षण नोंदवले जाते आणि असे मानले जाते की जेव्हा एखादा कैदी अभिवचन राजेवर असतो तेव्हा त्याच्या सुटकेचा कालावधी शिक्षेच्या एकूण कालावधीमध्ये गणला जात नाही.

५.२ **रोहन धुंगट (उपरोक्त)** प्रकरणातील या न्यायालयाने  नुकत्याच दिलेल्या निर्णयात, या न्यायालयाला तत्सम मुद्दा/प्रश्न विचारात घेण्याचा एक प्रसंग होता आणि अभिवचन रजेचा उद्देश आणि हेतू विचारात घेऊन, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे आणि असे म्हटले आहे की अभिवचन रजेवरील  सुटकेचा कालावधी प्रत्यक्ष कारावासाचा विचार करण्याच्या उद्देशाने मोजला जाणार नाही आणि अभिवचन रजेचा उक्त कालावधी वगळला गेला पाहिजे. रोहन धुंगट (उपरोक्त) प्रकरणात, या न्यायालयाने परिच्छेद १० मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहेः

> "१०. १४ वर्षांच्या प्रत्यक्ष कारावासाचा विचार करताना अभिवचन रजेचा कालावधी समाविष्ट करायचा आहे, असे कैद्यांच्या वतीने सादर केलेले निवेदन जर स्वीकारले गेले, तर अशा परिस्थितीत, प्रभाव पाडू  शकणाऱ्या कोणत्याही कैद्याला अनेक वेळा अभिवचन रजा मिळू शकते कारण त्यावर कोणतेही निर्बंध नाहीत आणि तो अनेक वेळा अभिवचन रजा मंजूर करून घेऊ शकतो आणि कैद्यांच्या वतीने सादर केलेला अर्ज स्वीकारला गेला तर तो प्रत्यक्ष कारावासाचा उद्देश आणि हेतूच निष्फळ करू शकतो. प्रत्यक्ष कारावासाचा विचार करण्याच्या उद्देशाने अभिवचन राजेचा कालावधी वगळला जावा, असे आमचे ठाम मत आहे.उच्च न्यायालयाने असे गृहीत धरलेल्या दृष्टिकोनाशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत."

६.        वरील बाबी लक्षात घेता आणि जेव्हा याचिकाकर्त्याला भारतीय दंड विधानामधील कलम ३०२/३४ अंतर्गत गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले जाते आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली जाते, तेव्हा त्याला माफीच्या संदर्भात कोणत्याही नियम/धोरणाच्या अधीन राहून ही शिक्षा भोगावी लागते आणि ज्या कालावधीत त्याला आपत्कालीन/अंतरिम अभिवचन रजेवर सोडण्यात आले आहे तो कालावधी प्रत्यक्ष कारावासाच्या उद्देशाने वगळण्यात यावा. या परिस्थितीत, याचिकाकर्त्याला प्रस्तूत रिट याचिकेत विनंती केलेल्या कोणत्याही दिलाशासाठीचा दावा करण्याचा अधिकार नाही.

या परिस्थितीत, प्रस्तूत याचिका गुणवत्ता विरहित आहे आणि ती फेटाळण्यास पात्र आहे आणि त्यानुसार फेटाळली जात आहे.

**[न्यायमूर्ती एम. आर. शाह]**

**[न्यायमूर्ती सी. टी. रविकुमार]**

**नवी दिल्ली;**
**२४ मार्च २०२३**

*****

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****